

मराठी अनुवाद :

श्री. अशोक कोठारे

# महाभारत



खंड ३४ : सल्यपर्व २

# महाभारत

## महाभारत खंड चौतिसावा

## सल्य पर्व दुसरा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे
ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**
G1102, Eternity, Eleventh floor
Eastern Express Highway. Thane, 400604
**www.esahity.com**
**esahity@gmail.com**
©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० नोव्हेंबर २०२०**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा चौतिसावा खंड, सल्य पर्व भाग दुसरा आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

## - सल्य पर्व भाग दुसरा (सुरू) –

## भाग एकसष्ठावा

धृतराष्ट्र बोलतात, "दुर्योधन खाली पडलेला पाहून अरे संजया मला सांग, पांडव आणि श्रींजय कसे वागले"?

संजय सांगू लागतो, भिमसेनाने दुर्योधनाला मारले ते पाहिल्यानंतर सगळे पांडव आणि कृष्ण फार आनंद दाखवू लागले. पांडव आणि श्रींजय त्यांची उपरणं हवेत उडवू लागले होते. कांहीं आनंदाने नांचत होते. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. कोणी ढोलकी बडवत होते तर कोणी झांजा वाजवत होते. एकच गदारोळ उडाला होता. समस्त पृथ्वी तो हर्ष सामावून घेण्यात असमर्थ होती. कांहीं त्याच्या तिरकमट्याने बाण उडवावयाला सुरूवात केली. सगळे आकाश त्यांने भरलेले होते. कांहीं नुसते हसत व एकमेकांत गप्पा मारण्यात गुंतलेले दिसत होते. कांहीं एकमेकांना मिठ्या मारत होते. भिमाच्या नांवाचा एकच जल्लोष होत होता. भिमाचे सगळे अभिनंदन करत होते. कांहीं वयस्क योद्धे आनंदाश्रू ढाळत होते भिमाकडे पहात. कांहीं त्याला बोलतात कीं, ते द्वंद्व इंद्राच्या वृत्राशी झालेल्या द्वंद्वाशी बरोबरी करणारे होते. तुझ्या शिवाय दुसरे कोणी त्याला मारू शकले नसते. तो मोठा गदाधारी म्हणून ख्यातनाम होता. त्याला तू शत्रूत्वाच्या पलिकडे नेऊन ठेवले आहेस आता तो तुम्हाला त्रास देऊ शकणार नाही. तुझे हे काम युगांतापर्यंत लोक आठवतील. तुझे भाग्य थोर आहे. अशा अनेक शब्दाने भिमाचे कौतुक होत होते सर्वकडून. कांहींना भिमाचे दुर्योधनाच्या डोक्याला लाथ मारणे फारच आवडले होते. कांहीं बोलले त्याचे मुंडके कापून काढावयाला पाहिजे कारण तेंच जिंकल्याचे चिन्ह समजले जाते क्षत्रियांमध्ये. तू दुःशासनाची छाती फोडून त्याचे रक्त प्याला तसे ह्याचेसुद्धा प्यायला पाहिजे होते असे अनेक योद्धे भिमाला बोलतात. तुझ्या विजयाची चर्चा सगळ्या तिनही जगात होईल. भाटांना तुझ्या जयाची गाणी गाण्यास आनंद होईल कारण ते कौरव चांगले लोक नव्हते. असा एकंदर सूर होता बोलणार्या सैनिकांचा.

अशारितीने पांडवांचे व पांचालांचे बोलत असतांना जनार्दन बोलतो, "अहो रांजांनो, मेलेल्याला आणखीन मारण्यात कांहीं अर्थ नाही. ते तमोगुणाचे लक्षण ठरते. तो आता मेला आहे. तो निर्लज्ज, हलकट, कोत्या मनाचा, स्वार्थी ज्याच्या भोवती त्याच्यासारखेच दरबारी जमले होते जो शहाणा सल्ला कधीच ऐकण्यास तयार नव्हता, मृत्यूच्या दारी गेला आहे. त्याने विदूर, द्रोण, संजय आणि कृपांचा कधीच मान राखला नाही कीं, त्यानी पांडवांचा भाग त्याना दिला पाहिजे. तो आता कोणी मित्र अथवा वैरी राहिलेला नाही. कारण सगळे शत्रूत्व मृत्यूनंतर संपले पाहिजे. जे तसे संपत नाही ते सर्वनाशास कारणीभूत होते. त्या मेलेल्यावर आपण आपली वाफ दवडण्यात काय अर्थ आहे"? आपण आपापल्या रथात बसा व निघा. आपण येथून निघाले पाहिजे. तुम्हा सगळ्यांना माझ्या शुभेच्छा.

ते कृष्णाचे बोल हळू हळू सावध होत असलेला दुर्योधन ऐकतो. तो उठण्याचा प्रयत्न करतो पण ते त्याला जमत नाही. कसाबसा तो उठून बसतो त्याच्या दोन हातांच्या मदतीने. रागाने तो कृष्णाकडे पहात असतो. फुटलेल्या मांड्यांतून बरेच रक्त गेल्यामुळे तो शुद्ध हरपून गेला होता. त्याची ती परिस्थिती न लक्षात घेता तो कृष्णाला उद्धटपणे बोलू लागतो. "अरे कंसाच्या खुन्या, तुला माहीत आहे कीं, गदायुद्धाचे नियम मोडून तो जिंकला आहे. तू त्याला सुचवलेस कीं तो माझ्या मांडीवर वार करेल आणि त्याने तसे केले. तुला काय वाटते, मी अर्जुनाला वृकोदराला खुणवतांना पाहिले नाही? असंख्य राजांचा मृत्यू तू घडवत होतास गेले अठरा दिवस ते मला माहित नाही असें समजू नकोस.

तसे कुकर्म करूनही तू निष्पाप असल्याचे ढोंग करत आहेस, तुझा धिक्कार असो. भिष्माना शिखंडीकडून तू मारले आहेस हे मी चांगले ओळखून आहे. अश्वत्थामा नांवाच्या हत्तीचा खून तू केलास व द्रोणांना खोटे सांगून त्यांना लढण्यापासून परावृत्त तू केलेस हे मी पहात होतो. अर्जुनाला मारण्यासाठी मिळवलेला शलाक कर्णाला घटोत्कचावर मारण्यास तू भाग पाडलेस ते मी जाणतो. अर्जुनाच्या बदल्यात तू भिमाचा मुलगा बळी दिलास ते भिमाला जर कळले तर तो तुला सोडणार नाही. सत्यकीला वाचवण्यासाठी तू अर्जुनाला भुरिश्रवाचे हात छाटण्यास सांगितले तेसुद्धा मला माहित

आहे. कर्ण पांडवांचे चांगले पारिपत्य करत असतांना तू त्या अश्वसेनाला पाठवून कर्णाचा बुद्धीभेद केलास तेसुद्धा मला माहीत आहे. कर्णाच्या रथाची चाकं कां रुतली तेसुद्धा मला ठाऊक आहे. जर पांडव नियमानुसार लढते तर तुम्हाला जय कधीच मिळाला नसता. स्वता नीच मार्गाने काम करावयाचे व दुसर्यांना सन्मार्ग शिकवावयाचा हा तुझा उद्योग जुना आहे"

वासुदेव बोलतो, तू गांधारीच्या मुला, तुझा घात तू स्वतः केला आहेस. तुम्ही जो पापमार्ग अवलंबिला त्याचा परिणाम ते झाले आहे. उगाच मला दोष देण्याने तुला कांहीं फायदा होणार नाही. मी हे युद्ध होऊ नये म्हणून तुला परोपरीने सांगत होतो पण तू कोणाचेच ऐकत नव्हतास. तुझा हट्ट त्या लोकांच्या मृत्यूस कारणीभूत आहे हे तू नाकारू शकणार नाहीस. पांडवांना जाळण्याचे, भिमाला विष खायला घालणे, द्रौपदीची विटंबना आणि इतर असंख्य गोष्टी ज्या तू व तुझे साथी सातत्याने करत होते त्यात कोणता सज्जनपणा होता ते सांग सगळ्यांना. तू ठार मारण्याच्या लायकीचाच आहेस. द्युताच्या खेळात कोणता सज्जन पणा होता? अभिमन्यूचा वध कोणत्या न्याय्य लढाईने तुम्ही सगळ्यानी मिळून केला"? तुझ्या त्या सगळ्या कर्माचे फळ तुला आज मिळत आहे. पांडवांची संपत्ती, त्यांचे राज्य तू गिळंकृत केलेस ते कोणत्या न्यायाने ते सांग. पांडवांचे राज्य त्याना वनवासानंतर परत करण्याचा वादा तू केला होतास तो तू कां नाही पाळलास तेव्हां तुझी नैतिकता कोठे गेली होती? तू मला नैतिकमुल्ये शिकवू नकोस.

दुर्योधन बोलतो, "मी शस्त्रांचा अभ्यास केला आहे. मी यज्ञ केले आहेत, मी जगावर राज्य केले आहे, मी ब्राह्मणांना दानं केली आहेत, इतका कोणी भाग्यवंत दुसरा नसेल. जसा अंत क्षत्रियाला मिळाला पाहिजे तसा मला मिळत आहे, ते काय कमी मोठे भाग्य आहे"? "मी असे सगळे भोग भोगले आहेत ज्यासाठी इतर राजे तरसत असतात. मी माझ्या सगळ्या मित्रांबरोबर व भावंडा बरोबर स्वर्गात जात आहे. माझ्यासारखा भाग्यवान कोणी दुसरा नसेल. तुम्ही त्या भिकारी राज्याचे आता स्वामी झाला अहात जे तुम्हाला पुन्हा उभे करावे लागणार आहे कारण मी त्याचे सगळे स्रोत वापरून नष्ट केले आहेत".

संजय पुढे सांगतो, तो ते बोलत असतांना आकाशातून दैवी फुलांचा पाऊस पडू लागतो. गंधर्व गाऊ लागतात. अप्सरा नांचत दुर्योधनाच्या किर्तीच्या गाथा गाऊ लागतात. स्वर्गातून त्याचे स्वागत असो असे सिद्ध बोलत असतात.

ते पाहून कृष्ण आणि पांडव शरमिंदे होतात. पांडव अस्वस्थ होतात. ते पाहून कृष्ण त्यांना धीरगंभीर आवाजात सांगतो, "ते सगळे मोठे योद्धे होते व त्यांचा नाश सरळ मार्गाने केवळ अशक्य होता. त्यांचा नाश मी व माझे कपी मित्र करत होते. फक्त असा भास होत होता कीं, तुम्ही त्यांना मारत होतात. तसे मी केले नसते तर तुमचा ठिकाणा लागला नसता. ते राज्य मिळाले नसते. दुर्योधनाचा पराभव यमालासुद्धा करता आला नसता. चलाखीचे महत्व व्यावहारिक जगात मोठे असते त्याचे प्रत्यंतर तुम्हाला मिळाले आहे. तुम्ही चांगले लढत होता. म्हणून त्या दोषाचा तुमचा कांहीं संबंध नाही. जे इंद्र करत होता ते आपण केले आहे तेव्हां विनाकारण मनाला लावून घेऊ नका. जीवनात कामयाब होण्यासाठी जे आवश्यक असते ते तुम्ही केले व तोंच पृथ्वीवर न्याय समजला जातो". जो फुलांचा वर्षाव झाला तो त्याचे स्वर्गात स्वागत करण्याच्यासाठी होता. त्याचा विचार करू नका.

कृष्णाचे ते ऐकल्यावर सगळे पांचाल, पांडव आणि श्रींजय व सोमक शांत होतात. दुर्योधनाला तेथे तसेच सोडून ते आपल्या ठिकाणी निघून जातात.

सल्य पर्व भाग एकसष्ठावा संपला.

# सल्य पर्व

## भाग बासष्ठावा

संजय पुढे सांगतो, ते राजे त्यांची भाला, बरची, सोटे, गदा इत्यादी शस्त्रांसह त्यांच्या मुक्कामी परतले. त्यांचा आनंद पहाण्यासारखा होता. ते विविध वाद्ये वाजवत जात होते. त्यांच्या मागून युयुत्सू व सत्यकी सुद्धा जात होते. त्याच प्रमाणे धृष्टद्युम्न आणि शिखंडीसुद्धा त्यांच्या मुक्कामी जात होते. द्रौपदीची मुलं सुद्धा गेली. त्यानंतर सगळे पार्थ दुर्योधनाच्या रिकाम्या तंबूत गेले. कौरवांचे सगळे तंबू रिकामे झाले होते कारण ते केव्हांच निघून गेले होते. तेथे गेल्यावर ते पांडव त्यांच्या रथातून उतरले. तेव्हां कृष्ण अर्जुनाला बोलतो, तुझे गांडीव खाली ठेव. त्याच प्रमाणे तुझे भातेसुद्धा खाली ठेव आणि तूसुद्धा प्रथम रथातून उतर. त्याप्रमाणे तो करतो. सगळे उतरल्यानंतर कृष्ण रथाचे लगाम खाली ठेवतो. त्यानंतर तो स्वतः उतरण्याच्याच वेळी रथावरील कपी व त्याचे विलक्षण साथ देणारे अजब दिसणारे प्राणीसुद्धा निघून जातात. आता तो रथ पूर्णतया रिता झाला होता. तो ध्वजसुद्धा नाहीसा होतो. त्यानंतर अर्जुन व इतर पांडव पहातात कीं, तो रथ पेट घेतो. थोड्याच वेळात तो पूर्णपणे नष्ट होतो. ते पाहून नम्र असे ते पांडव कृष्णाला विचारतात कीं, हे काय झाले?

वासुदेव त्यांना सांगतो, "युद्धाच्या दरम्यान द्रोण, कर्ण, भिष्म, कृप इत्यादिने विविध अस्त्रं, मंत्राने भरलेले तुझ्या रथाचा नाश करण्यासाठी फेकलेले होते. परंतु, मी व कपी आणि त्याचे विलक्षण स्वरुप असलेले दैवी शक्ती त्या रथात असल्यामुळे ते काम करू शकत नव्हते. परंतु, आता आम्ही सगळे निघून गेल्यावर मी त्या मंत्रांना त्यांचे काम करण्याची मुभा दिली व त्याप्रमाणे तुझा रथ भस्मसात झाला. अर्जुन हात जोडून त्याच्या पुढे उभा होता. तो कंठ भरलेला, कृष्णाला बोलतो, अरे दैवी पुरूषा, तुझे माझ्यावर किती उपकार आहेत त्याची मी कधी उतराई करू शकणार नाही. सगळे पांडव कृष्णाला मिठी मारतात. कृष्ण पुढे बोलतो, "तुम्ही मोठे भाग्यवान अहात. यश तुमची वाट पहात आहे. दैवीकृपेमुळें तुम्ही सगळे जीवंत अहात. आता तुम्हास लवकरच तुमच्या राजधानी कडे गेले पाहिजे ती उपप्लव्य तुमची वाट पहात आहे. तेथे

मला दही आणि मध देऊन माझे स्वागत करा. आणि प्रार्थना करा कीं, "अरे परमेश्वरा आमचे सगळ्यांचे तू सदैव कल्याण करत रहा". तसे बोलून तो स्वतःच तथास्तू असा आशिर्वाद देतो.

युधिष्ठीर बोलतो, "अरे जनार्दना, तुझ्याशिवाय आमचे कोण आहे ह्या दुनियेत? तूंच आमचा सहारा आहेस.द्रोणांने व कर्णाने सोडलेली ब्रह्मास्त्र केवळ तुझ्यामुळे व्यर्थ गेली. नाहीतर ह्या युद्धाचा रंग उलटला असता. तुझ्यामुळेंच ते महावीर संसप्तक मारले गेले. आम्ही फक्त कारण मात्र होतो हे आम्ही सगळे पांडव जाणून आहोत. तुझ्या कृपेमुळे मी त्या युद्धात लढू शकलो हे मी चांगले जाणून आहे".

पुढे तो बोलतो, "उपप्लव्यात व्यास मला म्हणाले होते, जेथे चांगुलपणा आहे तेथे कृष्ण असतोच".

संजय पुढे सांगतो, तसे संभाषण झाल्यावर पांडव त्यांच्या माणसांबरोबर दुर्योधनाच्या तळात जातात व तेथे असलेले सगळे धन दौलत व शस्त्रसामुग्री घेऊन निघतात. तेथे असलेल्या गुलाम बायका व पुरूष त्यांच्या बरोबर ते नेतात. अमर्याद संपत्ती त्याना मिळालली असते. त्यामुळे ते पांडव फार संतुष्ट झालेले दिसत होते. ते त्यांच्या पशूंना रथापासून मोकळे करतात व तेथे असलेल्या आरामदायी व्यवस्थेत थोडा काळ विश्राम करण्याचे ठरवतात. कृष्ण सांगतो कीं, आपण ह्या रात्री मात्र ह्या तंबूत रहाणे योग्य नाही म्हणून तेव्हां आपण सगळे ह्या तंबू बाहेर रहावयाचे. त्या प्रमाणे ते तसे करावयाचे ठरवतात. ते ओघवती नदीच्या तटावर त्यांचे तंबू टाकतात. तेथे विश्राम करू लागतात. कृष्ण मात्र हस्तिनापुराकडे प्रस्थान करतो, पांडवांचा प्रतिनिधी म्हणून तेथील कारभाराचा ताबा घेण्यासाठी. जसा कृष्ण त्याच्या रथाने निघतो, पांडव त्याला सांगतात, "आमची काकी गांधारीचे सांत्वन आमच्यावतीने करावे". तिचे दुःख कल्पना करण्या पलिकडले आहे.

यथावकाश कृष्ण हस्तिनापुरी पोहोचतो.

सल्य पर्व भाग बासष्ठावा संपला.

# सल्य पर्व

## भाग त्रेसष्ठावा

जनमेजय विचारतो, "युधिष्ठीर कृष्णाला गांधारीला भेटण्यासाठी कां सांगतो? कृष्ण त्या आधी समझौता करण्यासाठी गेला होता, परंतु, त्यात त्याला यश नाही आले. म्हणून युद्ध झाले, त्यात पांडव जिंकले मग आता तेथे कृष्णाने जाण्याची गरजच कां वाटली युधिष्ठीराला"? कांहीं खास कारण असावे नाहीतर तो सूज्ञ जनार्दन तसे करावयाचे ठरवणार नाही. तरी मला सांगा काय कारण होते.

वैशंपायन बोलतात, तू जो प्रश्न विचारत आहेस तो रास्त आहे. त्याचे कारण असें कीं, दुर्योधनाचा पराभव कपटाने झाला होता. ते जर त्याच्या आईला, गांधारीला समजले तर ती पांडवांना शाप देऊ शकते. ते होऊ नये म्हणून कृष्ण तेथे जाऊन तिचे सांत्वन करणार होता. तसे पाहिले तर जे कपट झाले त्याचा निर्देशक कृष्णच होता. गांधारीने सर्व आयुष्य तपस्या केली होती, ती एक ब्रह्मचारीणी होती. तिच्या वाणीत व नजरेत विलक्षण सामर्थ्य साठवलेले होते. त्याची भिती यमाच्या मुलाला वाटत होती. त्यानुसार ती शांत झाल्यावर युधिष्ठीर त्या राजधानीकडे जाणार होता. तिच्या सगळ्या मुलांचा व जावयाचा वध झाला होता त्याचा राग ती काढणार नाही असे समजणे कितपत योग्य ठरेल. वस्तुतः ते युद्ध तिच्या मुलांच्या हट्टामुळे झाले असल्यामुळे त्यात जर तिची मुलं मारली गेली तर त्याचा दोष पांडवांवर कसा जातो? हासुद्धा प्रश्न आहेच. आपल्या मुलांच्या चुकीने जर ते मेले आहेत तर त्याचा राग करण्याचा तिला अधिकार नसल्यामुळे ती रागावणार नाही उलट शरमिंदी झाली पाहिजे असें भिम बोलतो. अशा रागाला ब्रह्माचे समर्थन मिळणार नाही व म्हणून त्या कारणाने जर तिने शाप दिला तर तो कर्यरत होणार नाही. असे सव्यसाची बोलतो.

युधिष्ठीर कृष्णाला बोलतो, तुझ्या कृपेमुळें आम्हाला आमचे राज्य अशा उध्वस्त अवस्थेत प्राप्त झाले आहे. ते युद्ध असे होते कीं, देव आणि दानव लढत होते. त्यात आमचा विजय झाला आहे. आमच्यासाठी तुला कौरवांकडून अनेक वेळा अपमान सहन करावा लागला परंतु, त्याचे तू मनावर न घेता आम्हाला सतत मदत करत होतास.

आता दुर्योधनाचा मृत्यू झाल्यामुळे ते सगळे उपयोगाचे ठरणार आहे. तू तेथे जाऊन अशी कारवाई कर कीं, ती तुझी मेहनत व्यर्थ जाणार नाही. जरी आमचा विजय झाला तरी हृदयाची धडधड होत आहे. आता तुला गांधारीचा रोष कमी करावयाचा आहे. गांधारीने जर मला शाप दिला तर मी नष्ट होईन ह्याचे मला भय वाटते. तू सर्वकर्ता व नष्टकर्ता आहेस, ह्या जगाच्या उत्पत्तीत तुझा हात आहे. तुझ्या इच्छेने सगळे व्यक्त व अव्यक्त जग चालते. तू आमच्या काकीला शांत करू शकशिल असे मला वाटते. आमचे आजोबा कृष्ण-द्वैपायन सुद्धा तेथे असतील. तेव्हां तुझ्या किमयेने गांधारीचा राग कमी कर व मला वाचव. युधिष्ठीराची विनंती कृष्ण समजतो व त्याच्या सारथ्याला दारुकाला सांगतो कीं रथ तयार ठेवावा. त्याचा रथ तयार होतो. कृष्ण त्याच्या रथातून मोठ्या वेगांने हस्तिनापुरी निघतो. त्याच्या रथाच्या चाकांच्या आवाजाने ती नगरी गाजते. तेथे गेल्यावर तो कुरु राजाला त्याच्या आगमनाची वार्ता देतो. रथातून उतरतो व धृतराष्ट्राच्या वाड्यात प्रवेश करतो. तेथे व्यास आधीच उपस्थित होते. जनार्दन त्यांचे पाया पडतो. ते दोघे गांधारीला भेटतात. कृष्ण धृतराष्ट्राचा हात धरतो त्यांचे सांत्वन करण्यासाठी. त्याच्यापुढे तो रडण्याचे नाटक करतो. नंतर डोळे पुसतो व त्या राजाला बोलतो, "आपण सगळे जाणता अहात. तुम्हाला होऊन गेलेले व पुढे होणारे ह्याचा जाण आहे. काळाची पावले आपण चांगली समजता. पांडव कुरु घराण्याचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करत होते त्याची आपल्याला पूर्ण कल्पना आहे. परंतु, तुमच्या मुलाच्या हट्टापाई सगळे घडले जे टाळण्याचा मी खूप प्रयत्न केला तेसुद्धा आपण जाणता. पांडवांना शांतता व सलोखा आवडतो तेसुद्धा आपण जाणता. तुमच्या मुलाच्या हट्टापाई ते वनवासात गेले, अज्ञातवासात गेले, नाही नाही त्या हाल अपेष्टा सहन केल्या. युद्ध होऊ नये म्हणून मी स्वतः आलो होतो पण तुमचा मुलगा मानायला तयार नव्हता. अखेरीस नाईलाजाने युद्ध सुरू झाले व त्या अठरा दिवसात काय झाले ते आपण जाणताच. त्यामध्ये आपले भिष्म, द्रोण, कर्ण असे घरचे लोक मेले. आप्तात सोमदत्त, वल्हीक, भागादत्त मारले गेले. पांडवांचा आवडता अभिमन्यू मारला गेला तोसुद्धा कपट कारस्थानामुळें हे आपण जाणता. दोनही बाजूंचे न भरून निघेल असे नुकसान झाले आहे. शेवटी तुमचे मुलगे मारले गेले जे अशा युद्धात होणे अपरिहार्य

असते. त्याबद्दल कोणी क्षत्रिय तक्रार करणार नाही. तुमचा मुलगा विदूरांना, व्यासांना, कृपांना, द्रोणांना कोणालाच मानत नव्हता. एवढेच नाही तर तुमचा व त्याच्या आईचा सल्ला सुद्धा तो मानत नव्हता. आपण जाणता कीं, भाग्य अंतिम असते. त्यात जे लिहीले ते होणारच, त्याप्रमाणे झाले आहे. पांडवांचा विजय झाला आहे. परंतु पांडवांना तुमच्या व काकींबद्दल फार वाटते. ते मी सांगावयाला आलो आहे. आपण दोघे सुरक्षित असाल पांडवांच्या राज्यात. तुमचा योग्य मान राखला जाईल ह्याची खात्री बाळगा. जो नरसंहार झाला तो पांडवांच्या इच्छेने झाला नाही हे आपण जाणता. त्यामुळे युधिष्ठीर रात्र रात्र झोपू शकत नाही. आपण त्याचा स्वभाव जाणताच. तुम्हा दोघांना मातापित्याचा दर्जा पांडव देणार आहेत. तुमच्या परवानगीनेच तो व इतर पांडव हस्तिनापुरी येणार आहेत. तरी त्यांचे आपण स्वागत करून त्यांना शुभेच्छा तुम्ही उभयतानी द्यावी अशी मी आपल्या दोघाना विनंती करत आहे. त्यांचे स्वागत आपल्या रिवाजानुसार सौभाग्यवती राणी करते त्यासाठी गांधारी काकी ते करतील तर फार बरे होईल. सगळे पांडव आपल्या सर्वांच्या दुःखात सामील आहेत. तेसुद्धा तितकेच दुःखी झाले आहेत हे समजून आपण मला मदत करावी".

धृतराष्ट्राशी ते बोलल्यानंतर कृष्ण गांधारीला भेटतो. तिचे सांत्वन करण्यासाठी. तेथे तो बोलतो, "अहो सुवलकन्या, आपण व्रतस्थ जीवन जगला आहात. आपल्यासारखी स्त्री दुसरी नसेल. माझी विनती ऐकून घ्या. आपल्याला आठवत असेल कीं, मी त्या राजसभेत सलोख्याची विनंती केली होती व त्याला आपण व आपले पती असे उभयता मान्य करत होते. परंतु, दुर्योधन तुम्हाला सुद्धा मानत नव्हता. त्याच्या मित्रांनी त्याला असे गुंतवले होते कीं, तो आपल्याला सुद्धा मानत नव्हता. तुम्ही स्वतः त्याला त्यावरून रागावला होता. तुम्ही बोलला होती कीं, जेथे चांगुलपणा असतो तेथे यश जाते. तरी तो तुमचा मुलगा तुम्हाला जुमानत नव्हता. ते आपले म्हणणे आज सिद्ध झाले अशा साठी कीं, चांगुलपणा असलेले तुमचे पुतणे युद्ध जिंकले आहेत"? तुमची वाचा खरी झाली".

ते वासुदेवाचे ऐकल्यावर गांधारी त्याला बोलते, "तू बोलतोस ते खरे आहे, माझा मुलगा नालायक आहे हे मला माहीत आहे पण मी त्याला कांहीं करू शकत नव्हते.

तुझ्या बोलण्यात काय जादू आहे पहा, माझे अस्वस्थ मन शांत झाले आहे. जर दुर्योधनाने माझे त्यावेळी ऐकले असते तर हे दिवस दिसले नसते. मला आता वाटते कीं, शंभर अशी नालायक मुलं होण्यापेक्षा मी निपुत्रिक राहीली असती तर ते बरे झाले असते. असे बोलत ती राणी स्वताचे डोळे पुसू लागते. तू व तुझे मावस भाऊ पंडुची मुलं किती साधी व सुवाळू आहेत ते मी सुरूवाती पासून पहात आहे. त्यांचा नारागसपणा मला भावत असें. अगदी लहानपणा पासून ते चांगुलपणाचे पुतळे होते. अखेरीस ती देवांची लेकरं होती त्यामुळे तसे असणे अपेक्षित होते. पुढे सुद्धा माझ्या मुलांच्या त्रासाने त्रस्त झालेले मला कधी तक्रार करावयाला आले नाही. त्याचे मला फार नवल वाटत होते. कुंती खरोखरच फार भाग्यवान कीं , तिला अशी लेकरं झाली. असे बोलून ती माता आवंढा गिळून गप्प बसते. कृष्ण तिला शांत करण्याचा प्रयत्न करतो. तो तिचे दुःख समजत असते पण पांडवांच्या बद्दल गांधारीच्या मनात असलेली माया तो ओळखतो व समजतो कीं, युधिष्ठीराला जी भिती वाटते ती निराधार आहे. धृतराष्ट्र व माता गांधारी ह्याना नमन करून तो त्यांची रजा घेण्याचे ठरवतो. तो त्यांना बोलतो, "मी आपली रजा घेतो, आणखीन बोलत राहिलो तर तुमच्या दुःखात वाढ होईल. तरी मला रजा द्यावी. ते बोलत असतांना जनार्दनाला त्याच्या दिव्य दृष्टीने दिसते की, अश्वत्थामा कांहीं भयंकर योजना आखत आहे लांब कोठे अज्ञात स्थळी. म्हणून तो झटकन उठतो, तेथे असलेले व्यास मुनी ह्यांना नमस्कार करतो व तडकाफडकी निघतो. त्याला उपप्लव्याला जावयाचे असते. अश्वत्थामाला सगळे पांडव मारावयाचे असतात जेव्हां ते झोपलेले असतील असे कृष्णाला दिसते. तो बेचैन होतो. ते तो त्या वृद्ध जोडप्याला सांगतो तसे ते त्याला बोलतात कीं, "हे भयंकर आहे, जा आणि ते थांबव". कृष्णा त्याना आश्वासन देतो कीं, तो लवकरच पुन्हा त्यांना भेटण्यास येणार आहे. कृष्ण गेल्यानंतर व्यासमुनी त्या वृद्ध मातापित्यांचे सांत्वन करू लागतात. कृष्णाची हि शिष्टाई यशस्वी झाली होती. तो ती शुभ वार्ता युधिष्ठीराला सांगण्यासाठी वेगानी निघतो. पांडवांना भेटतो व सगळे जे घडले ते सांगतो.

सल्य पर्व भाग त्रेसष्ठावा संपला.

# सल्य पर्व
## भाग चौसष्ठावा

धृतराष्ट्र बोलतात, "अरे संजया, मला सांग माझा अति अभिमानी गर्विष्ठ मुलगा डोक्यात लाथ बसल्या नंतर व दोनही मांड्या मोडलेल्या असा काय करतो"?
संजय पुढे सांगतो, ऐका राजे तुमचा मुलगा त्या परिस्थित काय करतो, पांडव त्यांचे लोक घेऊन जातात तेव्हां तुमचा मुलगा बेहोष पडलेला होता. थोड्या वेळांनंतर, मातीत पडलेला तो तुमचा मुलगा त्याचे विस्कटलेले केस नीट करत त्या मोडक्या अवस्थेत पुढे सरकण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या अंगातून खूप रक्त वाहून गेलेले होते म्हणून तो बराच काळ भोवळ आल्या प्रमाणे पडला होता. तो आजूबाजूला पाहू लागतो. त्याच्या केसाच्या बटा त्याच्या डोळ्यापुढे येत होत्या त्या तो बाजूला करत असतो. त्याच वेळी उठण्याचा प्रयत्न सुद्धा करत असतो परंतु, ते त्याला जमत नाही तेव्हां त्याला समजते कीं त्याचे दोनही पाय निकामी झाले आहेत. तो सरपटू लागतो जसा साप असावा. तो मोठ्याने स्वगत करत असतो, एवढे सगळे रथीमहारथी माझ्या कडे असतांना माझी ही अवस्था कशी झाली. तो अखेरीस समजतो कीं, काळ सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्यापुढे कोणीही नाही. तो विचार करत असतो कीं, जे माझे उरलेले आहेत त्या निष्ठावंताना समजले पाहिजे मला भिमाने कसे लुच्चेगिरीने पांगळे केले आहे. पण ते कसे साध्य होणार?
संजय पुढे सांगतो, स्वताच्या कपटी कारवाया विसरून तुमचा मुलगा पांडवांच्या मोजक्या चलाखीबद्दल तक्रार करत असतो. त्यात भिष्माचा, भुरिश्रवाचा, जयद्रथाचा, द्रोणांचा असे तो आठवत असतो. मनातल्या मनात तो पांडवांना व त्यापेक्षा जास्त कृष्णाला शिव्या घालत असतो. पांडवांना तो शिव्याशाप देत असतो. त्याशिवाय दुसरे तो काय करणार होता त्या अवस्थेत. आपण कधीच उठू शकणार नाही ह्या विचाराने त्याच्या अंगाची लाही लाही होत असते. त्यानंतर तो मला म्हणजे संजयाला स्मरतो व त्याला व्यासानी दिलेल्या वरामुळे मी (संजय) त्याचे स्वगत ऐकू शकत होतो. तो मला सांगत होता कीं, मी त्याच्या मातापित्यांना त्याची अवस्था व ती

कोणी केली ते सांगावे. तो मला सांगतो, मी राजा अनेक यज्ञ केले, असंख्य दानं केली ब्राह्मणांना, अनेकांचा पोशिंदी असा मी ह्या अवस्थेत कसा गेलो ते त्यांना सांग. मी गृहस्थाश्रमाचे तीन उद्देश सातत्याने सांभाळले आहेत, त्यात धर्म, हित आणि सुख येतात. मी वेदांचा अभ्यास केला आहे, माझे सगळे आयुष्य मजेत गेले आहे, माझे मानणार्यांचे मी भले केले आहे, मी माझी कर्तव्ये (धर्म) यथोचित पार पाडली आहेत. माझ्या मित्रांचे हित साध्य केले आहे व सुखं भोगली आहेत. म्हणजे मी गृहस्थाश्रमाची बाजू चांगली सांभाळली आहे. मला क्षत्रियांचा सगळी कर्तव्ये करता आली आहेत. मी सर्व जीवनभर भाग्यवान शाबित झालो आहे. असे सगळे असतांना ह्यावेळी माझ्यावर अन्याय कां झाला व तोसुद्धा कृष्णाच्या सुचनेने झाला आहे. जो कृष्ण जनार्दन समजला जातो. माझ्या खास लोकांना समजले पाहिजे भिमाने माझ्याशी कसा दगा केला आहे. अश्वत्थामा, शरद्वताचे कृप, भोजराजा कृतवर्मन असे माझे जे अजून हयात आहेत त्यांना हे समजले पाहिजे. अरे संजया, तू पांडवांवर भरवसा करू नकोस कारण तू माझा आहेस, माझ्या पित्याचा विश्वसनीय सारथी आहेस. मी आता भिकारी झालो आहे व द्रोणांच्या मार्गाने जाणारा आहे. माझे सगळे साथी आधीच तेथे गेले आहेत. मला माझ्या बहिणीचे फार वाईट वाटते ती कशी राहिल तिचा पति मेला आहे व तिचे सगळे तिच्यावर प्रेम करणारे बंधूसुद्धा मेले आहेत. माझी पत्नी माझ्याबरोबर येईल त्याबद्दल मला शंका नाही कारण तिचे सगळे पुत्रसुद्धा मेले आहेत. बाकीच्याची मुलं लहान आहेत त्या रहातील. युधिष्ठीर व इतर पांडव तसे प्रेमळ आहेत हे मी जाणतो, म्हणून मला विश्वास आहे कीं, ते त्या विधवांना व त्यांच्या मुलांना चांगले वागवतील. आमच्या वरील राग त्यांच्यावर ते काढणार नाहीत एक भिम सोडला तर सगळे चांगले आहेत. कुरुक्षेत्री मरत असल्यामुळे माझे स्वर्गागमन निश्चित आहे. माझा निरोप द्रोणाच्या मुलाला दे. असे दुर्योधन मला सांगतो. परंतु, मला तो अश्वत्थामा कोठे आहे ते समजत नव्हते.

द्रोणाच्या मुलाला मी तो निरोप सांगितला त्याच्या राजाचा. तो ऐकून ते तिघे कोठे तरी निघून गेले.

सल्य पर्व भाग चौसष्ठावा संपला.

# सल्य पर्व

## भाग पासष्ठावा

संजय पुढे सांगतो, दुयोधनाचे काय झाले ते अश्वत्थामाला व इतर दोघांना समजते. ते स्वतः जखमांनी भरलेले होते. त्यांच्या अंगात खोल घुसलेले शर त्यांना बोचत होते. तरीसुद्धा ते त्यांच्या घोड्यांवर बसून जेथे दुर्योधन पडलेला होता तेथे जाण्यास निघतात. तो कण्हत होता. त्याच्या अंगातून आलेले रक्त थिजून घट्ट झालेले होते. त्याच्या मांड्या फाटलेल्या दिसत होत्या. तो धुळीने भरलेला होता. त्याच्या भोवती अनेक भयंकर हिंस्र श्वापदं जमलेली होती. थोड्याच वेळात ते त्याला खाणार होते परंतु, तो जीवंत असल्याने त्याला ते स्पर्श करत नसतात. दुर्योधनाला अशा अवस्थेत पडलेले पाहून त्यांना धक्का बसतो. ते पहातच रहातात. ते त्यांच्या रथातून उतरतात. त्याच्या जवळ जातात. तसे ते हिंस्र प्राणी दूर निघून जातात. अजून चांगला सूर्यप्रकाश असतो. ते पहात असतांना अश्वत्थामा त्याला बोलतो, "खरोखर ह्या जगात कोणतीही गोष्ट सांगता येणार नाही. केव्हां काय कोणाला होईल ते समजणे दुरापास्त आहे. एक सम्राट असा मातीत पडला आहे व त्याचे पाय तुटले आहेत. एकेकाळचा सगळ्यांना आवाज देणारा असा असहाय होऊन पडला आहे हे पहाता मला वाटते की, कांहीं होऊ शकते कोणाशीही. यमाच्या तर्हा विलक्षण असतात असें जे सांगितले जाते त्याची प्रचिती येते असे कांहीं पाहिले कां. कोठे गेली ती छत्री, कोठे गेल्या त्या चवर्या ज्या तुला वारा घालण्यासाठी असतं? एके काळचा आमचा तू राजा हि काय अवस्था झाली आहे तुझी"? सगळे क्षणभंगूर आहे. कशाचीच शाश्वती देता येत नाही. तू इंद्राच्या बरोबरीचा असे आम्ही समजत होतो, त्याची काय ही अवस्था. कृप विचारतात, "भिमाने तुला पाडले मांड्या तोडल्या परंतु, ठार कां नाही मारले अशा अवस्थेत कां ठेवून गेले ते तुझे शत्रू"?

दुर्योधन सांगतो कीं, "भिम त्याची तलवार सहदेवाकडे मांगतो तेव्हां तो ती भिमाकडे फेकतो. त्यानंतर भिम माझे केस (बटा) पकडून मला उठवतो तेव्हां मी ग्लानीत होतो. मला थोडे थोडे समजत होते. मोठ्या रक्तस्त्रावामुळे माझी शुद्ध जात होती तरी

मला काय होत आहे ते समजत होते. भिम माझे डोके कापणार इतक्यात त्यांचा मोठा त्याला तसे न करण्याचे सांगतो. तो सांगतो कीं, मी कसाही असलो तरी एकेकाळचा राजा होतो, त्यानंतर तो सांगतो कीं, भिमाने मला लाथ मारली तेसुद्धा अयोग्य झाले वगैरे बरेच तो बोलतो त्यामुळें माझे मुंडके छाटले गेले नाही, त्यानंतर मला तसाच टाकून ते गेले उपप्लव्याच्या दिशेने. मला एवढेच आठवते".

अश्वत्थामाचे दुःख पाहून दुर्योधन त्याला त्याचे अश्रू पुसत बोलतो, "मृत्यू कसा येणार ते विधाता ठरवतो जो सर्वश्रेष्ठ आहे. मृत्यू येणार हे निश्चित. माझा मृत्यू असा लिहीलेला आहे हेंच ह्यांचे उत्तर आहे माझ्या मित्रा. एका गोष्टीचे मला चांगले वाटते कीं, मी युद्धातून पाळालो नाही. मी सतत लढत होतो. मला त्याचा अभिमान वाटतो. मी माझ्या दोस्तांबरोबर मरत आहे त्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. मित्रानो मला तुमच्या शुभेच्छा द्या, त्यांची मला ह्यापुढच्या प्रवासासाठी फार आवश्यकता आहे. जर वेदात दिलेले खरे असेल तर मी खूप मोठा झालो आहे. माझ्या क्षात्र तेजामुळें. माझ्यासाठी शोक करू नका कारण मला क्षत्रियांचा मृत्यू आला आहे. माझा देह येथेच असाच राहूद्या. ते आकाशातील फिरस्ते मला खातील म्हणजे माझे स्वर्गागमन निश्चित होईल. कोणीही त्याचे भाग्य बदलू शकत नाहीत मग कितीही कर्मकांडे करा, यज्ञ करा ते सगळे फसवे आहेत ह्याची मला आता प्रचिती येत आहे. जे घडावयाचे ते घडणारच.

कृतवर्मन विचारतो, भिमाने तुमच्या खालच्या भागावर वार केला ते नियमानुसार अयोग्य असतांना तसे कां केले त्याचे कांहीं कारण असणार निश्चित. दुर्योधन थोडा थांबून सांगू लागतो, द्युताच्या वेळी त्याने प्रतिज्ञा केली होती कीं, त्याची गदा माझ्या मांडीवर बसेल जेव्हां मी त्यांच्या बायकोला माझ्या मांडीवर बसण्यास सांगितले होते. त्यासाठी कृष्णाने त्याला त्याची आठवण करून दिली व ते त्याने केले. पुढे दु्र्योधन सांगतो कीं, माझ्या सर्वांगाला चिलखत होते तरी मांडी उघडी झाली लढतांना. त्याचे असे झाले कीं, युद्धाच्या पहिल्या दिवशी मी माझ्या मातेला भेटण्यास गेलो तेव्हा ती मला म्हणाली कीं, मी तिच्यापुढे विवस्त्र होऊन उभे रहावे. त्यावेळी शकूनी मामा माझ्याबरोबर होता. मला लाज वाटली, मी ते केले नाही व मांड्या झाकण्या एवढे एक कापड मात्र घालून तिच्यापुढे गेलो होतो. तिने तिच्या डोळ्याची पट्टी काढली व मला ती पहात राहीली.

ती मला स्वता भोवती गोल फिरण्यास सांगते. मी तसे केले त्यानंतर ती मला म्हणाली की, तुझ्या ज्या भागावर माझी दृष्टी पडली ते भाग वज्रासारखे झाले आहेत व कोणत्याही शस्त्राने त्यावर कांहीं प्रभाव पडणार नाही. त्याप्रमाणे खरोखरच माझे सगळे शरीर वज्रासारखे झाले होते. परंतु माझ्या मांड्या झाकलेल्या होत्या व त्यावरच भिमाची गदा आदळली व त्या दोनही मांड्या तुटल्या. जर मी न लाजता माझ्या आईपुढे नग्न होऊन गेलो असतो तर कदाचित भिमाला माझी मांडी तोडता आली नसती. सगळा दैवाचा खेळ आहे दुसरे काय!

पुढे तो बोलतो, तुम्ही माझ्यासाठी बरेच कांहीं केले आहे त्यासाठी मी तुमचा ऋणी असेन. ते ऐकत असतांना अश्वत्थामाचा क्रोध वाढत होता. तो त्याचे हात वेडेवाकडे हलवत बोलतो कीं, माझ्या धन्याचा खून पांडवांनी कपटाने केला आहे त्याची शिक्षा मी त्यांना करणार आहे. तुमची हि अवस्था मला जास्त त्रास देत आहे. मृत्यूचे मला कांहीं वाटत नाही पण तुम्हाला अशास्थितीत ठेवून जाणे मला आवडलेले नाही. त्यापेक्षा डोके कापले असते तर बरे झाले असते कारण ते क्षत्रियांचा मृत्यू आहे. ह्याला काय म्हणावे तेंच समजत नाही. ह्याचा अर्थ युधिष्ठीराला तुम्हाला क्षत्रियाचा मृत्यू मिळू नये असें वाटत असावे. म्हणून त्यांने तुमचे डोके कापू दिले नाही आणि ते सगळे वासुदेवाच्या समक्ष व परवानगीने झाले ह्याचे जास्त वाईट वाटते. इतके क्रौर्य त्या पांडवांत असेल असे वाटले नव्हते. तो नंतर प्रतिज्ञा घेतो कीं तो सगळ्या पांचालांना व पांडवांना यमाकडे धाडणार आहे व ते सुद्धा कृष्णाच्या समोर, त्यासाठी त्याची सगळी मंत्रशक्ती तो वापरणार आहे. "मला त्याची आज्ञा करा राजे". असे तो दुर्योधनाला विचारतो. ते ऐकून दुर्योधनाला बरे वाटते. तो कृपाकडे पहात बोलतो, थोडे पाणी आणा. ब्राह्मण पाणी आणतात कारण नदी फार दूर नव्हती. त्या पाण्यांने अश्वत्थामाला आज्ञा द्या माझ्यावतीने. त्यानंतर दुर्योधन अश्वत्थामाला त्याच्या सैन्याचा सरसेनापति घोषित करतो. तू माझ्या वतीने ते करणार आहेस असे मी जाहीर करतो. त्याप्रमाणे अश्वत्थामा पांचवा सरसेनापति होतो दुर्योधनाच्या नसलेल्या सैन्याचा! तो एकटाच सैन्य व तोंच सरसेनापति असे होते. ते निघून जातात. दुर्योधन रक्ताने भरलेला तेथे पडलेला होता. त्याचे तिघांचे सैन्य तेथून जाते त्यांच्या नवीन मोहीमेसाठी. सल्य पर्व भाग पासष्ठावा संपला.

\-   सल्य पर्व संपले -

## भाषांतरकाराचा  परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,